तरुण भारत

मंगळवार, १७ सप्टेंबर २०१९

# वसंतदादा महाविद्यालयात हिंदी दिन साजरा



तासगाव : येथील पी. डी. व्ही. पी. महाविद्यालयात हिंदी दिना निमित्त बोलताना प्रा. एम. डी. माने.

प्रतिनिधी
तासगाव

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे हिंदी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.एम.डी. माने हे होते. आपल्या भाषणात त्यांनी हिंदीचे महत्व सांगितले. भाषेची भीती मनातून घालविली पाहिजे. पहिल्यांदा बोलायला शिका नंतर लिखान करा. हिंदी ही सोपी भाषा आहे असे सांगून जीवनात पुढे जायचे असेल तर चांगले ज्ञान आत्मसात केले पाहिजे. आई वडिलांची स्वप्ने साकार करण्याचा प्रयत्न करा, वडिलांविषयी मुलांच्या मनात आदर असावा भीती असू नये. याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे हे होते. यप्रसंगी कु. आरती कणसे व वनिता जमदाडे या विद्यार्थिनीनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.आर. बी. मानकर यांनी केले तर आभार प्रा. आर. एस. मोटे यांनी मानले. सूत्रसंचालन कु. निकिता कांबळे व प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले. कार्यक्रमाला प्रा. के. एस. पाटील, प्रा. जे. ए. यादव, प्रा. डॉ. बी. टी. कणसे उपस्थित होते.